

रयत शिक्षण संस्थेचे,

# राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर.



मराठी विभाग सन २०२४-२५

दि.२७ ऑगस्ट२०२४

## 'मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन' व 'श्रावणसरी' कार्यक्रम

## अहवाल

महाविद्यालयाचा मराठी विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाङ्मय मंडळ उद्घाटन' व 'श्रावणसरी' कार्यक्रम दि.२७ ऑगस्ट रोजी महाविद्यालयात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते 'परिमल' या भित्तीपत्रक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.विष्णु शिंदे यांनी भाषा व साहित्यविषयक मार्गदर्शन करून काही कविता सादर केल्या. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांनी अध्यक्षपद भूषविले व अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यार्थी, प्राध्यापक यांनी काव्यवाचन व काव्यगायन केले. तसेच यावेळी मराठी विभागाच्या वतीने 'परिमल' भित्तीपत्रकाचा अंक प्रकाशित करण्यात आला. सायन्स विभागाचे उपप्राचार्य प्रा.पी.एस.चौगुले, कला व वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्य डॉ.एम.के.कन्नाडे, मराठी विभाग प्रमुख डॉ.महेश रणदिवे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयातील सर्व विभागाचे विद्यार्थी प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रा.अंकुश घुले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.विनायक सरदेसाई यांनी केले तर आभार प्रा.बी.एम.ठाणेकर यांनी व्यक्त केले.

**परिणाम/निष्पती**

- विद्यार्थ्यांमध्ये वाङ्मयाविषयी आवड निर्माण होते.
- विद्यार्थी साहित्यलेखनास प्रवृत्त होतील.
- विद्यार्थ्यांना मराठी साहित्याविषयी ज्ञानात भर पडेल.

**लाभार्थी**

**89**







प्रमुख, मराठी विभाग

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

Principal,
Rajarshi Chh. Shahu College
Kolhapur.